दुरध्वनी क्र.०७१८२-२९७०३८
फॅक्स क्र. ०७१०४-२३८०३२
ई-मेल-srpfgr४@rediffmail.com

सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
समादेशक कार्यालय
राज्य राखीव पोलीस बल गट क्र ४,
हिंगणा रोड,नागपूर-४४००१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जावक क्र. गट क्र.४/ प्रली आशा /लेखी परीक्षा सुचना प्रसिद्धी / ३४२६/२०२३ दिनांक१९/०७/२०२३**

प्रति,
मा.पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

लक्षवेध:- Computer Cell, DGPMS

संदर्भ :- मा.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.प्रशि/ पो.शि.भरती/रिक्त पदे माहिती/१३२/२०२०/२५६५ दिनांक १७/०७/२०२३

विषय:- पोलीस भरती सन -२०२१ लेखी परीक्षेकरीता उमेदवांना दिनांक, वेळ तसेच सुचना प्रसिद्ध करण्याबाबत

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये सशस्त्र पोलीस शिपाई यांच्या ५४ रिक्त पदे भरण्याकरीता शारिरीक मोजमापं,कागदपत्र पडताळणी व मैदानी चाचणी प्रक्रीया दिनांक ०८/०२/२०२३ रोजी पुर्ण झाली असुन लेखी परीक्षेकरीता १:१० प्रमाणकानुसार एकुण १०५१ उमेदवार पात्र झालेले आहेत.

पोलीस भरती सन-२०२१ ची लेखी परीक्षा दिनांक २३/०७/२०२३ रोजी आयोजीत करण्याबाबत आदेश प्राप्त झालेले आहेत. करीता सोबत जोडलेल्या सुचना उमेदवारांच्या माहीती करीता आपले www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध होणेस विनंती आहे.

सहपत्र:- उमेदवारांकरती सुचना

(डॉ.प्रियंका नारनवरे)
समादेशक
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.४,नागपूर

**प्रत माहितीस सविनय सादर,**
मा.पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मा.अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल महाराष्ट्र राज्य, मुंबई.

दुरध्वनी क्र.०७१८२-२९७०३८
फॅक्स क्र. ०७१०४-२३८०३२
ई-मेल-srpfgr४@rediffmail.com

महाराष्ट्र शासन
समादेशक कार्यालय
राज्य राखीव पोलीस बल गट क्र ४,
हिंगणा रोड,नागपूर-४४००१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जावक क्र. गट क्र.४/ प्रली आशा /लेखी परीक्षा सुचना प्रसिद्धी /३४२७/२०२३ दिनांक१९ /०७/२०२३**

## सशस्त्र पोलीस शिपाई भरती सन-२०२१
## लेखी परीक्षेकरीता पात्र उमेदवारांना सुचना

१. राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.४, नागपुरच्या आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपाई यांच्या ५४ रिक्त पदे भरण्याकरीता शारिरीक मोजमाप,कागदपत्र पडताळणी व मैदानी चाचणी प्रक्रीया दिनांक ०८/०२/२०२३ रोजी पुर्ण झाली असुन लेखी परीक्षेकरीता १:१० प्रमाणकानुसार एकुण १०५१ उमेदवार पात्र झाले असुन सदर उमेदवारांची यादी http://www.maharashtrasrpf.gov.in व http://www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

२. मा.पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई यांचे पत्र क्र प्रशि/पोशि.भरती/रिक्त पदे माहीती/१३२/२०२०/२५६५ मुंबई दिनांक १७/०७/२०२३ अन्वये सशस्त्र पोलीस शिपाई भरती-२०२१ लेखी परीक्षा दिनांक २३/०७/२०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता घेण्यात येणार असुन त्याबाबतचे प्रवेशपत्र महाआयटी कंपनी, मुंबई यांचेकडुन वाटप करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे उमेदवारांना परीक्षाकेंद्रावर सकाळी ०८:०० वाजता उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

३. लेखी परीक्षे करीता येणाऱ्या उमेदवारांनी MAHA IT यांनी दिलेले परीक्षेबाबतचे प्रवेशपत्र तसेच मैदानी चाचणीच्या वेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र असे दोन्ही प्रवेशपत्र उमेदवारांकडे असतील तरच परिक्षा केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येईल.

४. उमेदवारांचे स्वत:चे वैध फोटो आयडी (उदा.पॅन कार्ड, आधार कार्ड, मतदारन कार्ड, वाहन चालक परवाना) सोबत असने अनिवार्य आहे.

५. उमेदवार यांनी कोणत्याही प्रकारचे पेन, मोबाईल फोन, डिजीटल वॉच, डायरी, मायक्रोफोन, ईअर फोन किंवा कोणतेही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक डिव्हाइस तसेच नोट्स व पुस्तके परीक्षा केंद्रच्या आत सोबत घेता येनार नाही याची नोंद घ्यावी

६. उमेदवारांनी परीक्षा केंद्रमध्ये एकदा प्रवेश केल्यानंतर परीक्षा संपेपर्यंत कुठल्याही परीस्तिथीमध्ये परीक्षा केंद्राच्या बाहेर जाता येनार नाही यांची नोंद घेण्यात यावी.

७. परीक्षा केंद्राच्या आवारात मित्र, नातेवाईक, पालक व अन्य अनाधिकृत व्यक्तीस प्रवेश देण्यात येनार नाही याची उमेदवारांना नोंद घ्यावी.

८. लेखी परीक्षेकरीता येतांना उमेदवारांनी स्वत:चे एक पासपोर्ट साईज छायाचित्र सोबत आनावे.

९. परीक्षा केंद्रावर अथवा परीक्षा केंद्राच्या परीसरात कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही या करीता प्रत्येक परीक्षा खोलीनिहाय सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत तसेच ओळख पटण्याकरीता प्रत्येक उमेदवारांची बायोमॅट्रीक्स घेण्यात येनार असुन डमी उमेदवार आढळुन आल्यास तसेच परीक्षे दरम्यान गैरवर्तन करतांना आढळुन आल्यास उमेदवारास लेखी परीक्षे करीता अपात्र ठरविण्यात येईल व योग्य ती आवश्यक कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल यांची उमेदवारांनी विषेश नोंद घ्यावी.

(डॉ.प्रियंका नारनवरे)
समादेशक
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.४,नागपूर